**-: प्रेसनोट दिनांक - ०५/१०/२०१९ :-**

**आरोपी लोकसेवक जीवन महादेव कांबळे, वय-३०, कनिष्ठ कार्यालयीन सहायक, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित, शाखा कार्यालय, शेंडा पार्क, कोल्हापूर वर्ग-३, सध्या रा.त्रिमुर्ती कॉलनी, कणेरीवाडी, ता.करवीर, जि.कोल्हापूर, मुळ रा. मु.पो.बाळे, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर यांनी तक्रारदार यांचेकडे ५५००/- रुपये लाच रक्कम स्विकारलेनंतर त्यांना रंगेहात पकडलेबाबत.**

---

तक्रारदार प्रमोद नारायण कदम, रा.जवाहरनगर हौसिंग सोसायटी, कोल्हापूर हे राहत असलेल्या घरामधील दोन्ही लाईट मीटर हे घरगुती वापरासाठी असतानाही त्यापैकी एका लाईट मीटरचे बिल हे कमर्शिअल वापरासारखे येत होते, म्हणून तक्रारदार यांनी लाईट मीटरच्या वापरात बदल करणेसाठी एम.एस.ई.बी. कार्यालय, शेंडा पार्क, कोल्हापूर या ठिकाणी जावून कनिष्ठ कार्यालयीन सहायक, जीवन कांबळे यांची भेट घेतली. त्यावेळी कनिष्ठ कार्यालयीन सहायक, जीवन कांबळे यांनी तक्रारदार यांच्या राहते घरातील कमर्शिअल लाईट मीटर बंद करुन त्या ठिकाणी राहत असलेल्या (भाडेकरु) कुळाचे नांवे नविन लाईट मीटर कनेक्शन घ्यावे लागेल असे सांगून, (भाडेकरु) कुळाचे नांवे नविन लाईट मीटर कनेक्शन तात्काळ पाहिजे असल्यास मला ५५००/- रुपये द्यावे लागतील असे सांगून तक्रारदार यांचेकडे कनिष्ठ कार्यालयीन सहायक, जीवन कांबळे यांनी लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक २६/०९/२०१९ रोजी एम.एस.ई.बी. कार्यालय, शेंडा पार्क, कोल्हापूर येथील कनिष्ठ कार्यालयीन सहायक, जीवन कांबळे यांच्या विरुध्द तक्रार दिली.

तक्रारदार यांचे तक्रारी प्रमाणे दिनांक २७/०९/२०१९ रोजी एम.एस.ई.बी. कार्यालय, शेंडा पार्क, कोल्हापूर येथे शासकीय पंच साक्षीदार यांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता पडताळणीमध्ये एम.एस.ई.बी. कार्यालय, शेंडा पार्क, कोल्हापूर येथील कनिष्ठ कार्यालयीन सहायक, जीवन कांबळे यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या राहते घरातील कमर्शिअल लाईट मीटर बंद करुन त्या ठिकाणी राहत असलेल्या (भाडेकरु) कुळाचे नांवे नविन लाईट मीटर कनेक्शन तात्काळ देणेकरीता ५५००/- रुपये लाचेची रक्कम मागणी केली. तसेच त्या सोबत संबंधीत कागदपत्रे, प्रतिज्ञापत्र, प्रॉपर्टी कार्ड लागलीच घेवून येण्यास सांगितलेचे पडताळणीमध्ये निष्पन्न झाले. त्याप्रमाणे लागलीच एम.एस.ई. बी. कार्यालय, शेंडा पार्क, कोल्हापूर या ठिकाणी कनिष्ठ कार्यालयीन सहायक, जीवन कांबळे यांचेविरुध्द सापळयाचे आयोजन केले असता, कनिष्ठ कार्यालयीन सहायक, जीवन कांबळे यांनी संबधीत कागदपत्रे स्विकारुन प्रतिज्ञा पत्र, प्रॉपर्टी कार्ड घेवून येण्यास सांगितले व लाच रक्कम स्विकारली नाही.

कनिष्ठ कार्यालयीन सहायक, जीवन कांबळे यांनी मागणी केले प्रमाणे लाच रक्कम रुपये ५५००/- व प्रतिज्ञापत्र, प्रॉपर्टी कार्ड घेवून बोलवले असलेने आज दिनांक ०५/१०/२०१९ रोजी एम.एस.ई.बी. कार्यालय, शेंडा पार्क, कोल्हापूर या ठिकाणी कनिष्ठ कार्यालयीन सहायक, जीवन कांबळे यांचेविरुध्द सापळयाचे आयोजन केले असता, कनिष्ठ कार्यालयीन सहायक, जीवन कांबळे यांनी पंच साक्षीदार यांचे समक्ष तक्रारदार यांचेकडून ५५००/- रुपये लाचेची रक्कम व प्रतिज्ञापत्र, प्रॉपर्टी कार्ड यांची मागणी करुन ती लाच रक्कम व कागदपत्रे स्विकारलेनंतर त्यांना रंगेहात पकडणेत आले असून त्यांच्याविरुध्द राजारामपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रीया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री.राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/ पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस उपआयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, सहायक फौजदार, शामसुंदर बुचडे, पोलीस नाईक, नवनाथ कदम, पोलीस कॉन्स्टेबल, मयुर देसाई, तसेच चालक पोहेकॉ.सुरज अपराध, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केलेली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२) मा.पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे**
**दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३**

**३) श्री.आदिनाथ बुधवंत , पोलीस उपअधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर**
**मो.नं.- ९०११२२८३३३ व कार्यालय फोन नंबर- ०२३१/२५४०९८९.**

**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक :- १०६४.**

**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३**